# महिला सशक्तीकरण व लोकशाही

**प्रा. डॉ. आर. एस. शिंदे,** संशोधक मार्गदर्शक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, राजर्षी शाहू महाविद्यालय,परभणी

**कोकरे तुकाराम सिताराम,** श्री रेणुकादेवी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, जालना (पासिंग अधिकारी ) रा.वैद्य वडगाव ता. मंठा, जिल्हा. जालना (एम.ए.बी.एड.अर्थशास्त्र )

मो.९७६३४३९०४०, **Email :- tukaramkokare35@gmail.com**

---

**प्रस्तावना :**

आपल्या देशातील महिलांचे सशक्तीकरण होणे गरजेचे आहे. सशक्तीकरण म्हणजे महिलांची अध्यात्मिक, राजकीय, सामाजिक शक्ती वाढवणे. आज आपल्या देशातील महिला शिक्षण, राजकारण, मिडिया, कला आणि संस्कृती, सेवा क्षेत्र, इत्यादी क्षेत्रात भाग घेतात. आज आपण पाहतो कि शिक्षणाने प्रगती होऊन राजकारणात राष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्री या सारख्या मोठाल्या पदावर पोहचल्या आहे. उदा. प्रतिभाताई पाटील, इंदिरा गांधी, निर्मला सीतारामण, सुषमा स्वराज, इत्यादी महिलांनी राजकीय क्षेत्रात चांगलाच ठसा उमटवला आहे. एवढेच नव्हे तर शैक्षणिक क्षेत्रात देखील चांगली कामगिरी केली आहे. या सर्वामागे जर कोणाची प्रेरणा असेल तर सावित्रीबाई फुलेंची कारण पहिल्या काळी महिलांना शिकविले जात नव्हते. चूल आणि मुल एवढेच तिचे साम्राज्य होते, परंतु आता आधुनिक युगात महिला प्रत्येक क्षेत्रात पुरुषांच्या खांद्याला खांदा लाऊन काम करत आहेत.

**उद्दिष्ट्ये:-**

१) महिलावर होणाऱ्या अत्याचाराचा अभ्यास करणे.

२) महिलांच्या प्रतिनिधित्वाचा अभ्यास करणे.

३) महिलांच्या सशक्तीकरणासाठी पुरुष प्रधान मानसिकता बदलणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन द्वितीय सामग्रीवर आधारित आहे. **महिला सशक्तीकरण व लोकशाही** या विषयावर संशोधन करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यात प्रामुख्याने संशोधनपर लेख, मासिके, पुस्तके शासनाद्वारे प्रकाशित विविध अहवाल व संशोधनाशी संबंधित विविध संकेत स्थळे इत्यादी मधून माहिती संकलित करण्यात आलेली आहे.

**महिलांवर होणारे अत्याचार:**

समाजात महिलांच्या वाट्याला बहुदा दुय्यम स्थान येते, त्यामुळे कार्यक्षमता असूनही स्वतःचा विकास चांगल्या प्रमाणात करून घेता येत नाही. यामुळे महिलांचे खच्चीकरण होते. आपण पाहतो कि, काही महिलांना घरून जाणून बुजून त्रास दिला जातो. त्यांना त्यांच्या मर्जीप्रमाणे वागणूक दिल्या जात नाही. सतत छळ केला जातो.याला जबाबदार कोण? आजही काही मुलींना उच्च शिक्षण घेण्यास बंधने आहेत म्हणून त्या

उच्च शिक्षण घेऊ शकत नाही. त्यामुळे आज सरकार अर्थ संकल्पामध्ये महिलांच्या खाससुविधेसाठी प्रयत्नशील आहे. महिलांसाठी धोरणे व योजना आखणे.त्यांच्या विकासासाठी आवश्यक त्या तरतुदी करणे इत्यादी. तसेच महिलांच्या आरोग्यावर होणारे परिणाम स्वपुर्तेच मर्यादित न राहता त्याचा परिणाम कुटुंब विशेषतः मुलावर आणि पर्यायाने समाजावर सुद्धा होत आसतो. त्यामुळे महिलांचे आरोग्य जपणे हा खूप महत्वाचा विषय आहे. काही ठिकाणी महिला कार्यालयात काम करत असतात, तर त्याठिकाणी त्यांना मानसिक त्रास दिला जातो.हा त्रास दिला जाऊ नये म्हणून त्यावर उपाय योजना करणे व तत्काळ अंमलबजावणी करणे गरजेचे असते. पुरुष आणि महिला समान मानून त्यांनाहि पुरुषांप्रमाणे दर्जा देण्यात यावा. पुरुषांप्रमाणे शिक्षण घेता यावे, पुरुषांप्रमाणे समाजात वावरता यावे. या सर्व दृष्टीकोनातून महिला सशक्तीकरण ही काळाची गरज आहे.आज आपण पाहतो आहे कि, जात, धर्म ,वंश, सत्ता प्रदेश यामुळे हिंसा वाढती आहे, तर या हिंसेचा प्रभावी मुकाबला करन्यासाठी स्त्रियांना पाठबळ देणे तसेच या प्रकारचा त्रास होणार नाही यासाठी उपाय योजना राबून त्याची अंमल बजावणी करणे गरजेचे आहे.

**महिलांचे वर्चस्व** :

महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख चढता आहे. आणि आलेख चढता असण्यामागे महिलांची भूमिका महत्वाची आहे. आज आपण पाहतो आहे कि, प्रत्येक क्षेत्रात महिला प्रगतीपथावर आहे. हि बाब निश्चितच महाराष्ट्रासाठी अभिमानाची आहे. महिलांसाठी राबवण्यात येणाऱ्या धोरणांचा हा परिणाम आहे, असे म्हणने वावगे ठरणार नाही. परंतु असे करत आसताना आधुनिक युगातील नवीन बाबी, आव्हाने यांचा विचार करून सुधारणा करणे खूप गरजेचे आहे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला दिवंगत आहे परंतु, त्यांना त्यांच्या अधिकाराचा पूर्णपणे वापर करता येतो का? त्यांना स्वतःच्या मर्जीप्रमाणे निर्णय घेण्याची परवानगी आहे का? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. परंतु आजच्या आधुनिक युगात जगताना महिलांना मोठ्या प्रमाणत शासनाकडून सुविधा मिळत आहेत. याच बळावर महिला आपले वर्चस्व निर्माण करत असुन प्रगतीपथावर आहे. घटना दुरुस्ती ७३ व ७४ नुसार महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के आरक्षण देण्यात येऊन २०११ च्या निवडणुकीत ५० टक्के आरक्षण देण्यात आले. महिला सक्षमिकरनाच्या दृष्टीकोनातून खूप महत्त्वाची गोष्ट आहे. आता क्षेत्र कोणतेही असो महिला प्रतिनिधित्व करताना दिसून येत आहे. उदा. बँकिंग, पोलीस दल, जिल्हाधिकारी, राजकीय क्षेत्र, सामाजिक क्षेत्र इत्यादि.

**लोकशाहीआणिमहिला विकास** :

व्यक्तीचे स्वातंत्र्य आणि मुलभूत हक्क यांचे रक्षण महत्वाच्या दृष्टीकोनातून लोकशाही व्यवस्थेतच केले जाते. याचा अर्थ देशातील सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला न्याय मिळवून देण्याचे कार्य हे लोकशाही व्यवस्थेतच पार पाडले जाते. लोकशाही म्हणजे रक्तपात विरहीत मार्गानीलोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारक बदल घडवून आणणे होय. आज आपण पाहतो कि भारतात पुरुष प्रधान परीस्थिती आहे, या

मुळे महिलांना पाहिजे तेवढे अधिकार नाही. म्हणून हि परिस्थिती समान करून पुरुषांप्रमाणे महिलांना निर्णय घेण्याचे अधिकार असावेत. तेव्हा महिलांचा विकास होईल. आपण म्हणतोच कि एक शिकलेली आई शंभर शिक्षकास समान आसते. आणि हे आगदी बरोबर आहे आहे, कारण कुटुंबाला योग्य दिशा देण्याचे महत्वाचे काम महिलाच करत आहे. महिलांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात महिलाकेन्द्री धोरणे, योजना, तरतुदी करणे आवश्यक आहे. जगात जेन्डर बजेट नावाने प्रचलित असलेली हि संकल्पना महाराष्ट्र शासनास अतिशय महत्वाची वाटत असून त्या दिशेने पाउल उचलत आहे.

**महात्मा जोतिबा फुलेंचे स्त्रिशिक्षणाचे महत्त्व** :

स्त्रीयामुळे समाजाचा आणि राष्ट्राचा विकास होतो. त्यामुळेच जोतिबा म्हणतात कि, जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी. विद्या हा राष्ट्राचा प्राण, अखंड जीवन व माणुसकीची ती ज्योत आहे. विद्या हाच सुधारणेचा पाया आहे, हाच विचार करून त्यांनी शैक्षणिक कार्याला सुरुवात केली. शैक्षणिक कार्यात त्यांनी सर्वप्रथम स्त्रियांच्या शिक्षणाला महत्त्व दिले.

थोडक्यात, महिला सक्षमीकरण घडून आणायचे असेल तर महिलांना उच्च शिक्षण देऊन पुरुषांप्रमाणे आधिकार देण्यात यावे.

**संदर्भ :**

१)अनिल मुरलीधर कठारे-आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास,विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद.

२)विजय कांडलकर - भारतातील लोकशाही आणि महिला सक्षमीकरण,नागपूर.

३)विजया रहाटकर - साद, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई.

४)महिला व बालविकास विभाग मंत्रालय, मुंबई.

५)शहा घनश्याम - भारतातील सामाजिक चळवळी.